# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग-दोन

### मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२१/ फाल्गुन १८, शके १९४२.

**३८.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, गुरुवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे सुरु होणारे पुर्वनियोजित आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन आता सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजीपर्यंत विधान भवन, मुंबई येथे होणार आहे.

त्यानुसार पुर्वनियोजित अधिवेशनासाठी शुक्रवार, दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या चक्रानुक्रमानुसार या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या प्रश्नांपैकी मंगळवार, दिनांक २ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ या कालावधीतील प्रश्नोत्तरे कार्यवाहीत घेण्यात येतील. शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२१ ते शुक्रवार, दिनांक २६ मार्च, २०२१ या कालावधीत कार्यवाहीत घेतलेले उर्वरित सर्व प्रश्न तसेच मा.सदस्यांकडून प्राप्त झालेल्या सर्वसाधारण व प्रश्नातून उद्‌भवलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना आता व्यपगत करण्यात आल्या आहेत.

विधान भवन,<br>मुंबई.<br>दिनांक : ९ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**<br>सचिव<br>महाराष्ट्र विधानपरिषद

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य,<br>
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव<br>
३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
४) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.<br>
६) संगणक कक्ष (वेबसाईट)